## सरतपासणी वादी तर्फे ॲड.श्री.बी.एस.शिंदे

आता मला दि.२६/११/२०१० रोजीच्या खरेदीखताची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. सदरचे खरेदीखत हे नोंदणीकृत असल्यामुळे त्यास **नि.कं.११४** देण्यात येते. आता मला विशेष भु-संपादन अधिकारी, पुर्णा प्रकल्प, लातूर यांनी दि.३०/०६/२००४ व दि.०५/०४/२००१ रोजी पारीत केलेल्या निवाडयांच्या प्रमाणीत प्रती सादर केल्या आहेत त्यास **नि.कं.११५ व ११६** देण्यात येतात. आता मला दि.२६/११/२०१० रोजीच्या खरेदीखताची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. सदरचे खरेदीखत हे नोंदणीकृत असल्यामुळे त्यास **नि.कं.११७** देण्यात येते. आता मला दि.०३/०६/२०१३ रोजीच्या खरेदीखताची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. सदरचे खरेदीखत हे नोंदणीकृत असल्यामुळे त्यास **नि.कं.११८** देण्यात येते.

## उलटतपासणी प्रतिवादी कं.१, ३, ५, ८ ते १२ व १५ ॲड.श्री.एस.बी.चाटे

हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकती या एकत्र कुटूंबाच्या असुन त्या प्रतिवादी कं.१, ३, ५, ८ ते १२ व १५ यांनी खरेदी घेतल्यामुळे त्या मिळकती एकत्र कुटूंबाच्या आहेत.

## उलटतपासणी प्रतिवादी कं.६, ७ व १६ ॲड.श्री.एस.व्ही.देशमुख

हे म्हणणे खरे आहे की, मी नि.कं.११४, ११७ व ११८ या खरेदीखतांबाबत सांगत आहे त्या खरेदीखतांच्या वेळी प्रत्यक्षात त्यावेळी मी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, वरील खरेदीखतांच्या वेळी मी प्रत्यक्षात हजर नसल्यामुळे मला त्याविषयी माहिती नाही. माझे वडील नरसिंग यांना दोन पत्न्या आहेत. त्यांच्या पत्नींचे नाव पंचफुलाबाई व जिजाबाई आहेत. पंचफुलाबाई हिला एक मुलगा आहे. त्याचे नाव संभाजी आहे. जिजाबाई हिला चार मुले व दोन मुली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी कं.१ हे दि.१२/०६/२०१९ मध्ये वारले. पंचफुलाबाई ही सप्टेंबर २०१९ मध्ये वारल्या. जिजाबाई या हयात आहेत. नरसिंग

यांना चार बहिणी होत्या. त्यांची नावे सरस्वती व्यंकटराव कुमटकर, हरणाबाई रावसाहेब पवार, हिरकणबाई माधवराव लोहकरे व मुक्ताबाई आहेत. सरस्वतीबाई ही वारली आहे.

**मध्यान्नाची वेळ झाल्यामुळे पुढील उलटतपास तहकुब करण्यात येतो.**

समक्ष

(अ.रा. सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
अहमदपूर. दि.२४.०२.२०२०.

**पुढील उलटतपास शपथेवर सुरू**

हे म्हणणे खरे आहे की, नरसिंगराव यांची पहिली पत्नी पंचकुलाबाई होती. हे म्हणणे खरे आहे की, नरसिंगराव यांनी पंचकुलाबाई ही जिवंत असताना जिजाबाई हिच्या सोबत लग्न केले होते. नरसिंगराव यांना २० एकर वडीलोपार्जित शेत जमीन होती. नरसिंगराव यांना गट क्रं.११४, १११, १६६, १५४, १५३ व १५५ यात वडीलोपार्जित शेत जमीन होती. नरसिंगराव यांनी स्वत: खरेदी घेतलेली एकुण ४० ते ४५ एकर जमीन आहे. नरसिंगराव यांनी गट क्रं.१६६, १६४, १११, १३४ व १२५ मधील जमीनी विकत घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रं.१६६ मधील जमीन ही खरेदी घेतलेली जमीन आहे व ती वडीलोपार्जित जमीन नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रं.१६४ मधील प्रत्येकी ६ एकर जमीन ज्ञानोबा पाटील व ग्यानोबा पाटील यांच्या कडुन खरेदी घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रं.६६ मधील १६ एकर जमीन गोपीनाथ शिवणखेडे यांच्याकडुन खरेदी घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रं.१११ मधील १ हे. जमीन विठ्ठलराव पाटील कडुन खरेदी घेतली होती. नरहरी देशमुख यांच्याकडुन नरसिंगराव यांनी गट क्रं.११४, १३४ व १२५ मधील अंदाजे १० एकर जमीन विकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, नरसिंगराव यांनी ज्या काही जमीनी खरेदी घेतल्या होत्या त्यातील काही जमीनी स्वत:च्या नावे घेतल्या होत्या व काही जमीनी मुलांच्या नावे खरेदी घेतल्या होत्या. हे म्हणणे

खरे आहे की, गट क्रं.१११, १६४ व १६६ या जमीनी माझ्या वडीलांनी खरेदी घेतलेल्या आहेत व त्या वडीलोपार्जित जमीनी नाहीत. नरसिंगराव यांना वडीलोपार्जित घर आहे त्या घरांचे क्रमांक ७७, ७६, ८८ व ८७ आहेत. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, नरसिंगराव यांच्या नावाने दोन प्लॉट होते त्याचे क्रमांक ३०९, ९५ व १६८ आहेत. नरसिंगराव यांनी घर क्रं.७७ हे बापुराव कदम व घर क्रं.१६८ हे दिनकर पाटील यांच्याकडुन खरेदी घेतलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, घर क्रं.७७ व १६८ हे माझ्या वडीलांनी खरेदी केल्यामुळे ते वडीलोपार्जित मिळकत नाही.

हे म्हणणे खरे आहे की, नरसिंगराव यांच्या दोन्हीही पत्नींमध्ये पटत नसल्यामुळे ते वाद करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, पंचकुलाबाई हिचा मुलगा संभाजी हा सन १९९५ पासुन वेगळा राहत आहे. संभाजी याला गट क्रं.१६४ मधील ११ एकर जमीन वाटुन दिली होती. सुधाकर यांना गट क्रं.१५४ मधील अंदाजे १० एकर जमीन वाटुन दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, नरसिंगराव यांच्या ज्या वडीलोपार्जित जमीनी होत्या त्यापैकी काही जमीनी त्यांनी त्यांच्या मुलांच्या नावावर केल्या आणि ज्या जमीनी त्यांनी स्वत: खरेदी घेतल्या होत्या त्यापैकी काही जमीनी त्यांच्या मुलांच्या नावावर करून दिल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, नरसिंगराव यांनी ज्या जमीनी त्यांच्या मुलांच्या नावावर व इतरांच्या नावावर करून दिल्या आहेत त्या त्या जमीनींचे ते मालक झालेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रं.१६६ मधील ६ एकर ३७ आर ही प्रतिवादी क्रं.६ च्या मालकीचे आहे. मी ज्युनियर प्राध्यापक म्हणुन कुमार स्वामी महाविद्यालय, औसा येथे सन २००३ पासुन कार्यरत आहे. प्रतिवादी क्रं.६ हा सन १९९५-९६ पासुन जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिक्षक म्हणुन कार्यरत आहे. प्रतिवादी क्रं.८ व ११ हे शेती करतात. प्रतिवादी क्रं.६ हा लातूर येथे राहतो. हे म्हणणे खरे नाही की, नरसिंग, संभाजी, गंगाधर, सुधाकर, बबन व मी वेगवेगळे राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, आमचे राहणे व खाणे-पिणे हे सर्व वेगवेगळे आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, आम्ही चार वर्षापासुन वेगवेगळे राहत आहोत. कारण त्यांनी मला वाटुन दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रं.४ ही प्रतिवादी क्रं.६ सोबत राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्रं.४ हिचा औषधाचा संपुर्ण खर्च हा प्रतिवादी क्रं.६ करीत आहे. प्रतिवादी क्रं.७ ही प्रतिवादी क्रं.६

सोबत लातूर येथे राहते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी कं.७ हिच्या नावावर मौजे हरंगुळ येथील दोन प्लॉट कं.७४ व ७५ आहेत. साक्षीदार स्वत: हुन सांगतो की, ते प्लॉट प्रतिवादी कं.७ व त्याच्या लहाण भावाच्या पत्नीच्या नावावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी कं.६ ने प्लॉट कं.७४ व ७५ हे त्याच्या नौकरीच्या पैशातुन खरेदी घेतलेले आहे. प्लॉट कं.७४ व ७५ हे भंडारी कडुन खरेदी घेतलेले आहे. मला भंडारी यांचे पुर्ण नाव माहित नाही. ते दोन प्लॉट सात लाख रूपयाला खरेदी घेतले होते. मी त्या प्लॉट संबंधीचा बैनामा वाचुन पाहिला होता.

प्रतिवादी कं.१० ही माझ्या पेक्षा मोठी आहे. प्रतिवादी कं.१० व माझा जन्माचा दाखला मी दाखल करू शकतो. हे म्हणणे खरे आहे की, गट कं.१६६ मधील ८० आर जमीन प्रतिवादी कं.६ ने भगवान याला दि.०३/०६/२०१३ रोजी विकी केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या विकी प्रमाणे भगवानच्या नावाचा फेरफार कं.३२६ घेण्यात आला व त्याचे नाव ७/१२ उता-यावर घेण्यात आलेले आहे. भगवान याच्या नावावर झालेल्या फेरफाराविरूध्द मी अपिल किंवा कोणताही आक्षेप नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.०३/०६/२०१३ पासुन गट कं.१६६ मधील ८० आर भगवानने खरेदी घेतल्यापासुन तो त्या जमीनीच्या मालकी ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत कं.१३६९/२०१३ हे माझ्यावर बंधनकारक आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जी वाद मिळकत नमुद केलेली आहे ती ज्याच्या त्याच्या नावावर असुन ती त्यांच्या मालकी व ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे व प्रतिवादींचे एकत्र कुटूंब नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीमध्ये माझा १/५ हिस्सा नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी नरसिंगरावच्या दुस-या पत्नीचा मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सदरचा दावा हा नरसिंगराव हयात असताना दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला वाद मिळकतीमध्ये वाटुन मागण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांच्या ज्या मी चार बहिणींची नावे सांगीतली आहे त्या आमच्या कुटूंबातील सदस्य नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी हरणाबाई उर्फ मुक्ताबाई हिचे वारस, हिरकणबाई व प्रयागबाई यांना चुकीने दाव्यात प्रतिवादी म्हणुन सामील केलेले आहे. माझ्या पत्नीचे नाव जयश्री मधुकर कदम आहे. तिचे वडीलांकडील नाव पद्मावती जनार्दन माने होते. जनार्दन यांचे पुर्ण नाव जनार्दन सुभाणराव

माने आहे व ते हावरगा, ता.जळकोटचे आहेत. मी माझ्या कमाईतुन लातूर व जळकोट येथे कोणतेही प्लॉट व जमीन खरेदी घेतलेले नाही. मी माझ्या पत्नीच्या व सास-याच्या नावे प्लॉट किंवा जमीनी खरेदी घेतलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पत्नीच्या व सास-यांच्या नावावर प्लॉट व जमीन खरेदी घेतली असुन ती मिळकत सदरच्या दाव्यात समाविष्ट केलेली नाही.

मी प्रतिवादी क्रं.१,३,५,८,१० ते १२ व १५ यांच्याशी संगणमत करून सदरचा दावा दाखल केलेला आहे. साक्षीदार आता सांगतो की मी संगणमत करून दावा दाखल केलेला नाही. शासनाने सुधाकर नरसिंग कदम, बबन नरसिंग कदम व संभाजी नरसिंग कदम यांच्या नावावर असलेल्या जमीनी हया पाझर तलाव बाबळदरा करीता संपादीत केलेल्या आहेत. सुधाकर नरसिंग कदम याला रूपये १,७०,०००/- मावेजा मिळालेला आहे. बबन नरसिंग कदम याला रूपये १,८०,०००/- मावेजा मिळालेला आहे व संभाजी नरसिंग कदम याला रूपये ४,२५,०००/- चा मावेजा मिळालेला आहे. मी त्यांना मिळालेला मावेजा यात माझा सुध्दा हिस्सा आहे याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. भगवान याने त्याच्या नावावर असलेल्या जमीनीवर कर्ज उचललेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, भगवान याने जे कर्ज घेतलेले आहे त्या कर्जाची तोच परतफेड करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र सादर केले असुन आज खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास काही नाही.
वा.दा.ब.अ.अ.क.केले.

समक्ष

(अ.रा. सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
अहमदपूर. दि.२४.०२.२०२०.